**प्रतिवादीं तर्फे सा.क्र.१ चा अतिरिक्त सरतपास – श्री. एम. जी. बडदारे वकील.**

**१६.** आता मला प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी माझ्या हक्कात करुन दिलेले वटमुखत्यारपत्र दाखवले, त्यातील मजकूर बरोबर असून त्याला **नि. क्र.५२** देण्यात येतो. आता मला वादी व प्रतिवादी क्र.४ यांनी माझ्या हक्कात करुन दिलेले हक्कसोडपत्र दाखवले, त्यातील मजकूर बरोबर असून त्याला **नि. क्र.५३** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलट तपास – श्री. जी. टी. ठाकूर वकील.**

**१७.** माझे बी. कॉम पर्यंतचे शिक्षण झालेले आहे. सर्व दावा मिळकती आमच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. आमच्यामध्ये सदर मिळकतींच्या सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. वादीने १९९९ साली आंतरजातीय विवाह केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या आंतरजातीय विवाहामुळे आमचे तिच्यासोबत चांगले संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या लग्नानंतर आम्ही वडिलांच्या मृत्यूनंतर सन २००७ साली तिच्याशी प्रथम संपर्क केला होता.

**१८.** वादी वडिलांच्या मृत्यूपर्यंत आमच्याकडे येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ व ३ प्रमाणे वादी आमच्याकडे नियमित येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादी घरी येऊन केवळ आमच्या आईला भेटून जात होती.

**१९.** आमच्या वडिलांच्या नावे आजरा कारखाना व आजरा सुतगिरणीमध्ये शेअर्स होते. मला आमच्या वडिलांचे के. डी. सी. सी. बँकेत पैसे असल्याची माहिती नाही. वडिलांच्या मृत्यूनंतर वादी व आम्ही त्यांच्या नावे असलेल्या शेअर्स व पैशांची वारस होतो. हे म्हणणे खरे नाही की, वडिलांच्या नावावरील शेअर्स स्वतःच्या नावावर करण्याचा आम्ही प्रयत्न केला होता. मला आजरोजी सदर शेअर्सची काय परिस्थिती आहे याबाबत माहिती नाही.

**२०.** हे म्हणणे खरे नाही की, सदर शेअर्स नावावर करण्यासाठी मी वादीला वटमुखत्यारपत्र आणि प्रतिज्ञापत्र लागत आहे असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठी आम्ही वादीला दि.२०.०८.२०१४ रोजी तहसिल कार्यालयात बोलावून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी घरातील कर्ता पुरुष असल्यामुळे सर्व महिलांवरती माझा प्रभाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याचा वापर करुन वादीकडून वटमुखत्यारपत्र व

प्रतिज्ञापत्र करत असल्याचे सांगून हक्कसोडपत्राचा दस्त करुन घेतला आहे.

**२१**. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर हक्कसोडपत्रातील मजकूर वादीला वाचून दाखविलेला नसून तीने वाचून पाहिलेला आहे. आजरा येथे माझ्या नावाची मी एकमेव व्यक्ती आहे. हक्कसोडपत्रा सोबतचे कागद आणि मुद्रांकशुल्क वादीने उपलब्ध करुन दिलेले नव्हते. हक्कसोडपत्रासाठी आवश्यक असलेले कागद व मुद्रांकशुल्क मी उपलब्ध केलेले आहेत. मला वादीने सांगितल्यामुळे मी सदर पुर्तता केली आहे. मला वादीने त्याबाबत लेखी परवानगी दिली नव्हती.

**२२**. संदिप प्रभूगावकर प्रतिवादी क्र.३ चे पती आहेत. विजय बोलकेचे वडिल आमचे शेतमजूर आहेत. रहिमतुल्ला चे वडिल आमच्या गिरणीत कामगार होते. विशाल आपटे हा आमच्या गल्लीत राहणारा आहे. हे म्हणणे खरे नाही की, हक्कसोडपत्रावरील वरील सर्व साक्षीदार केवळ माझ्या संपर्कातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादीने हक्कसोडपत्र लिहून दिल्याचे मी खोटे सांगत आहे. मला प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी शेती कामाबाबत नि. क्र.५२ चे वटमुखत्यारपत्र लिहून दिलेले असून ते अद्याप पर्यंत रद्द केलेले नाही.

**२३**. मला प्रतिवादी क्र.४ ने शेतमिळकती बाबत वटमुखत्यारपत्राने सर्व अधिकार दिले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तरीदेखील मी आईकडून हक्कसोडपत्र लिहून घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हक्कसोडपत्रा वरती प्रतिवादी क्र.४ ने इंग्रजीमध्ये स्वाक्षरी केल्याचे खोटे सांगत आहे.

**२४**. दावा मिळकती आमच्या वडिलांना वाटपामध्ये मिळालेल्या आहेत. दावा घर मिळकतीची पुर्वीच्या आजरा ग्रामपंचायत व आताच्या आजरा नगरपंचायतीला नोंद आहे. त्यामध्ये वादीच्या नावाची नोंद वडिलांच्या मृत्यूपूर्वी व मृत्यूनंतर देखील कायम आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर घराचा उतारा हक्कसोडपत्राचा भाग नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तो जाणीवपूर्वक हक्कसोडपत्रा सोबत दाखल केलेला नाही.

**२५**. आम्ही दि.२०.०८.२०१४ रोजी केवळ एकदाच हक्कसोडपत्र करण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात गेलो असून त्याव्यतिरिक्त इतर कधीही गेलेलो नाहीत. मी

हक्कसोडपत्र करण्यासाठी दि.१८.०८.२०१४ रोजी एस. बी. आय. बँकेतून मुद्रांक पेपर विकत घेण्यासाठी डी. डी. काढला होता. हे म्हणणे खरे नाही की, हक्कसोडपत्राचा दस्त वादीने निबंधक कार्यालयात सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा दस्त केवळ मी सादर केलेला आहे.

**२६**. हे म्हणणे खरे नाही की, वादीने आंतरजातीय विवाह केल्यामुळे आमचा तिच्यावरती राग आहे. हे म्हणणे खरे आहे की, बागेवाडी वकिल वादीच्या ओळखीचे नसून आमच्या घराच्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, हक्कसोडपत्राचा दस्त बागेवाडी वकिलांनी तयार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी बागेवाडी वकिलांच्या मदतीने वादीच्या अपरोक्ष हक्कसोडपत्राचा दस्त केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने आंतरजातीय विवाह केलेला असून तीचे माझ्याशी प्रेमाचे संबंध नसल्यामुळे तिला माझ्या हक्कात हक्कसोडपत्र करुन देण्याची ईच्छा नव्हती.

**२७**. हे म्हणणे खरे नाही की, वादीला सदर हक्कसोडपत्राची माहिती फेरफारची नोटीस आल्यानंतर समजली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर वादीने माझ्याकडे हक्कसोडपत्र करुन दिले नसल्याबाबत विचारणा केली होती. वादी महसूल विभागाकडे हरकत घेत असल्यामुळे मी आजरा न्यायालयात कॅव्हेट दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर वादीने माझ्याशी संपर्क केला असता, मी व प्रतिवादी क्र.४ ने तिला सदर विषय सात–आठ महिन्यांमध्ये संपवण्याचे आश्वासन देऊन त्याप्रमाणे आम्ही हक्कसोडपत्र रद्द करण्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही.

**२८**. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात वादीला प्रतिवादी क्र.४ ने सोन्याचे दागिने दिल्याचे खोटे सांगत आहे. माझ्याकडे वादीला प्रतिवादी क्र.४ ने सोन्याचे दागिने दिल्या बाबतच्या तोंडी पुराव्या व्यतिरिक्त इतर कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने करुन दिलेले कथित हक्कसोडपत्र रद्द होऊन तिला दावा मिळकतीत हिस्सा मिळू नये यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १६.०६.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.